**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED JOURNAL, JUNE-JULY 2018, VOL- 6/28*

# सृजनशीलता : एक जीवनकौशल्य

**Prof. Lokhande Gokuldas Dattatray[1] & Borse C. M.[2], Ph. D.**

[1]*(Researcher)*

[2]*(Guide), Principal, MVP's College of Education, Nashik*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :**

शिक्षण हे समाजविकासाचे महत्वपूर्ण साधन आहे. अनौपचारिक शिक्षण जन्मभर जरी चालत असले तरी औपचारिक शिक्षणातून पध्दतशीरपणे मुलाचा विकास घडवता येऊ शकतो. औपचारिक शिक्षण पध्दतीत अनेक उणीवा आहेत. पण तरीही मनुष्यबळ विकास व्हायचा असेल तर औपचारिक शिक्षणाचीच कास धरायला हवी हे उघड आहे. सामाजिक, आर्थिक मागासवर्गीय व आदिवासी मागास मुलांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी आत्तापर्यंत केलेले प्रयत्न अपुरे ठरले आहेत. मुले शाळेत आली तरी ती टिकण्याचा प्रश्न आहे. या सर्व प्रश्नांवर उपाययोजना करताना शिक्षण क्षेत्रातील धोरण ठरविणारे, धोरणे राबविणारे प्रशासक आणि शिक्षण व्यवस्थेचा कणा असणारे शिक्षक या सर्वांनाच नवे पर्याय शोधायला हवेत. नव्या कल्पना लढवायला हव्यात. थोडक्यात म्हणजे स्वत:ची सर्जनशीलता विकसित करायला हवी.

ईश्वर या जगाचा निर्माणकर्ता असून त्याच्याकडे मोठया प्रमाणात नवनिर्माण क्षमता आहे. त्याने हे सर्व विश्व निर्माण केले असून आपण सर्व या विश्वाचे घटक आहोत. ईश्वराकडून आपल्या प्रत्येकाकडे नवनिर्माण क्षमता संक्रमित झालेली आहे. प्रत्येक व्यक्तित एकाच प्रकारची नवनिर्माणक्षमता संक्रमित न होता प्रत्येकातील ही क्षमता वेगवेगळया प्रकारची आहे. या नवनिर्माणक्षमतेलाच सर्जनशीलता या नावाने ओळखले जाते. कला, साहित्य, विज्ञान, व्यापार, अध्यापन या व जीवनातील सर्व क्षेत्रामध्ये सर्जनशीलता दिसून येते. या सर्जनशीलतेमुळे जीवनातील सर्व क्षेत्रामध्ये नवनवीन कल्पना निर्माण होऊन सामाजिक आणि सांस्कृतिक बदल घडवून येतात.

सर्जनशीलता किंवा नवनिर्मितीक्षमता ही इष्ट अशी गोष्ट आहे. तिची जोपासना नीट केली तर ती केवळ कलात्मक क्षेत्रातच प्रगती करील असे नव्हे तर तिच्यामुळे समस्या सोडविण्याची क्षमता अंगी येईल. एवढेच नव्हे तर सर्व तऱ्हेच्या समस्यांना नवीन उकलने निर्माण करता येईल. जरी सर्जनशीलतेची काही विशिष्ट लक्षणे असली तरी ती काही व्यक्तीतच आढळतील व इतरांत आढळणार नाहीत असे होत नाही.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सर्जनशीलता ही एक सुप्तशक्ती आहे आणि ती सुप्तशक्ती कमी अधिक प्रमाणात सर्वांच्या ठायी असते. म्हणून पुष्कळांना हया सुप्तशक्तींचा उपयोग करण्यास शिकविता येईल.

**सर्जनशीलता म्हणजे काय?**

सर्जनशीलता हा शब्द संस्कृत भाषेमधील 'सृज' हया धातूपासून तयार झालेला आहे. 'सृज' म्हणजे निर्माण करणे. त्यावरुन सर्जनशीलता ही नवे निर्माण करण्याची शक्ती ठरते. काहीतरी नवे निर्माण करावे असे आपल्याला वाटत असते. ईश्वराने सृष्टी निर्माण केली आहे असे आपण ऐकतो. आम्ही शब्दसृ  सृष्टीचे ईश्वर आहोत असे कवी म्हणतो. कवी किंवा कलावंत हे एक प्रकारे एक कल्पित सृष्टी जन्माला घालत असतात. नवनिर्मितीची क्षमता म्हणजे निर्माणक्षम प्रज्ञा होय.

**टॉरन्स** या मानसशास्त्रज्ञाने सर्जनशीलता या संकल्पनेत ठरीवपणा, तोचतोचपणा, निश्चितता यांना अजिबात जागा नसते असे सांगितले. मौलिकता, नव्या कल्पना, वेगळा दृष्टीकोन, समस्यांकडे पाहण्याची नवी दृष्टी हे अर्थ सर्जनशीलतेतून सूचित होतात.

सर्जनशीलता ही एक प्रकारची मानसिक शक्ती आहे. कृती, कला, मानसिक चिंतन व वैचारिकता, यांच्या बाबतीतही सर्जनशीलता ही संज्ञा वापरली जाते. कला निर्मितीच्या आणि साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात ही संज्ञा प्रामुख्याने वापरली जाते. कलावंत सर्जनशील असतो असे म्हणतात. कलावंतांच्या संदर्भात प्रतिभेला, निर्मिती क्षमतेला सर्जनशीलता किंवा सृजनशीलता असे म्हटले जाते.

**सर्जनशीलतेचे स्वरुप :**

माणूस हा निर्मितीक्षम म्हणजेच सर्जनशील प्राणी आहे. इतर प्राण्यांमध्ये माणसाइतकीच निर्मिती क्षमता दिसत नाही. प्राण्याच्या बहुविध कृती हया ठरीव स्वरुपाच्या असतात. अनुवंशाने प्राप्त झालेल्या क्रिया एवढेच प्राण्यांच्या कृतीचे मर्यादित स्वरुप असते याउलट सर्जनशीलता हे माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. भा  ानिर्मिती ही माणसाची सर्जनशील कृती आहे. माणसाने कला निर्माण केल्या, गरजांच्या पूर्तीसाठी वस्तू किंवा साधने निर्माण केली. ही त्यांच्या सर्जनशीलतेचीच खूण मानावी लागेल. कुटुंब समाज, सामाजिक संस्था, सांस्कृतिक संस्था, शासन संस्था यांची निर्मिती देखील मनु  यमात्राची सर्जनशीलतेचीच खूण आहे. इतर प्राणीमात्रांनी अशी आयुधे किंवा संस्कृती निर्माण केलेली नाही म्हणून सर्जनशीलता हीच मानवी अस्तित्वाची खरी ओळख म्हणावी लागेल.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**मानवी कृतीमधून व्यक्त होणारी सर्जनशीलता :**

कुंभार माती या द्रव्यातून चाक आणि काठी अशा साधनांतून आपल्या हस्तकौशल्यातून मातीच्या विविध वस्तू घडवितो, मातीला आकार देतो, आकारामध्ये विविधता आणतो. कुंभाराची ही कला त्याच्या सर्जनशीलतेची ओळख पटविते. शेती करणारा शेतकरी हा सुध्दा सर्जनशीलच म्हणावा लागेल. परंपरेने आलेली शेतीची अवजारे न वापरता अत्याधुनिक यंत्राच्या मदतीने शेती केली जाते. पिकांना पाणीपुरवठा करणे, जमीनीची मशागत करणे, धान्याची साठवणूक करणे इत्यादी कामाकरीता शेतकरी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे. अशी विविध विचार मानवी कृतीतून सर्जनशीलता प्रकट करतात.

**मानवी भाषेतून व्यक्त होणारी सर्जनशीलता:**

भाषा ही तर सर्जनशीलतेची फलश्रुती आहे. एका शब्दातील घटकांची नव्यानव्या पध्दतीने मांडणी करुन अनेक शब्द घडविण्यात सर्जनशीलता दिसते. एका शब्दाशी रुप वा अर्थदृष्टया जुळणारा सर्वस्वी नवा शब्द सूचने यातही भाषिक सर्जनशीलतेचे दर्शन होते.

**शास्त्रज्ञाची सर्जनशीलता:**

शास्त्रज्ञ संशोधन करतात, नवे शोध लावतात, संशोधनाची अशी क्रिया सर्जनशील कृती होय. तर्क करणे, प्रयोग करणे, समस्येचा वेध घेण्यासाठी विविध पर्याय शोधणे, पर्यायाची निवड करणे यातही शास्त्रज्ञ कल्पकतेचा वापर करतात. त्यांच्या प्रयोगशीलतेत सर्जनशीलता असते. इतरांनी शोधलेली शास्त्रीय तथ्थे पाहून त्यावर आधारलेले तंत्रज्ञान विकसित करणे, वस्तूनिर्मिती करणे या कृतीतही सर्जनशील कृती असतात. नवे नवे शोध ही शास्त्रज्ञांची सर्जनशीलता असते.

**कलावंतांची सर्जनशीलता:**

शिल्पकार शिल्प निर्माण करतो. दगड, माती वा धातूसारख्या द्रव्यातून तो नवेनवे आकार निर्माण करतो. त्यातून नवनिर्मितीचा जन्म होतो. आपल्याला फक्त दगड दिसतो तर शिल्पकाराला त्या दगडात काही सौंदर्यपूर्ण आकार दिसत असतात. त्याला जाणवलेल्या आकारांना छिन्नी हातोडयाच्या सहाय्याने तो कोरुन काढतो. आपल्या कल्पकतेच्या किंवा प्रतिभेच्या जोरावर तो त्याला जाणवणारे अमूर्त आकार मूर्तीच्या रुपाने प्रत्यक्षात आणतो. कलावंत हा द्रव्याची नवी मांडणी करतो. हे नवनिर्माण म्हणजेच सर्जनशीलता होय.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**सर्जनशीलतेचे घटक:**

१. विपुलता – कोणत्याही वस्तूच्या, व्यक्तिच्या, घटनेच्या, परिस्थितीच्या किंवा वि याच्या संदर्भात अधिकाधिक कल्पना किंवा विचार सुचण्याची क्षमता म्हणजे विपुलता होय. विनासायास व भराभर कल्पना सूचने म्हणजेच सहजता व वेग ही वैशिष्टये यात अभिप्रेत आहेत.

२. लवचिकता – अनेक प्रकारच्या कल्पना सुचूनही त्यात जर सारखेपणा, तोचतोचपणा असेल तर त्यात विविधता हे वैशि टय आढळून येणार नाही कल्पनांची विविधता व वैचिन्र्य हा सर्जनशीलतेचा दुसरा महत्त्वाचा घटक आहे.

३. मौलिकता – सामान्यत: कोणाला सुचणार नाही अशी कल्पना मौलिक असते. नाविण्य, असाधारणता, असामान्यता म्हणजे मौलिकता होय.

४. विस्तार – एखादी अपूर्ण कल्पना, अर्धवट योजना पूर्ण करणे, तपशील भरणे, समस्यापूर्ती, अर्धवट कविता किंवा कथा पूर्ण करणे, अर्धवट काढलेल्या आकृतीत रंग भरणे, अर्धवट सोडलेला कामाचा आराखडा आपल्या कल्पकतेने पूर्ण करणे ही सर्व विस्तार क्षमतेची वैशिष्टये होत.

**सर्जनशीलतेचा विकास व शिक्षकाची भूमिका :**

१. विपुलता – विपुलता हा सर्जनशीलतेचा घटक विकसित करण्यासाठी शिक्षकांनी खालील कार्यक्रमाचे आयोजन करावयास हवे.

   कविता करणे, कविता पूर्ण करणे, गोष्ट लिहीणे, गोष्ट पूर्ण करणे, विविध विषायावर चित्र काढणे, निबंधलेखन स्पर्धा आयोजित करणे, चित्राचे वर्णन करणे.

२. लवचिकता – लवचिकता हा सर्जनशीलतेचा घटक विकसित करण्यासाठी शिक्षकांनी खालील कार्यक्रमाचे आयोजन करावयास हवे.

   विविध विषयावर व्याख्याने आयोजित करणे, श्रुतलेखन स्पर्धा आयोजित करणे, वाचन व लेखन स्पर्धा आयोजित करणे, निबंधलेखन स्पर्धा आयोजित करणे, चित्रकला स्पर्धा घेणे, पत्रलेखन स्पर्धा घेणे.

३. मौलिकता – मौलिकता हा सर्जनशीलतेचा घटक विकसित करण्यासाठी शिक्षकांनी खालील कार्यक्रमाचे आयोजन करावयास हवे.

   कविता स्पर्धा आयोजित करणे, प्रात्यक्षिक स्पर्धा आयोजित करणे, प्रतिकृती स्पर्धा आयोजित करणे, चित्रकला स्पर्धा आयोजित करणे.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

४. विस्तार – विस्तार हा सर्जनशीलतेचा घटक विकसित करण्यासाठी शिक्षकांनी खालील कार्यक्रमाचे आयोजन करावयास हवे.

घोषवाक्य स्पर्धा आयोजित करणे, प्रतिकृती तयार करण्यास सांगणे, नवीन वाक्य तयार करणे, संवाद तयार करणे, कथानक तयार करणे, घटनेचे वर्णन करणे, नाटक लिहीण्याची स्पर्धा आयोजित करणे.

## संदर्भ

*शैक्षणिक मानसशास्त्र – ह.ना. जगताप*
*शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र – वा. ना. दांडेकर*
*सुबोध शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र – प्र. ल. नानकर व शिरोडे*
*मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम – य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक*
*जीवन शिक्षण – म.रा.शै.सं.व प्र.परिषद, पुणे*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*